महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२०

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

खडकवासला (जि.पुणे) धरणाच्या जलाशयातून पाणी चोरी होत असल्याबाबत

(१) ६७ (१०-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (जि.पुणे) धरणाच्या जलाशयातून मोठ्याप्रमाणात पाणी चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या जलाशयातील जलवाहिन्यातून पाणी चोरी होण्याच्या अनेक घटना वारंवार घडत असून देखील पाटबंधारे विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणामध्ये संबंधित विभागाचे अधिकारी आणि बांधकाम गृहप्रकल्पांचे विकासक यांच्या संगनमताने पाणी चोरी होत असल्याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा, पत्रव्यवहार, बैठका घेऊन कारवाई करणे कामी विनंती केली असता कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-११-२०२०) : (१) हे खरे नाही.

अशा प्रकारची पाणीचोरी निर्शनास आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

रत्नागिरी जिल्हा रुग्णालय येथे दिव्यांगांची होत असलेली गैरसोय

(२) ७४ (२०-०३-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील जिल्हा रुग्णालयत दिव्यांगांची होणारी गैरसोय यासह इतर अनेक प्रलंबित मागण्यांबाबत जिल्हा दिव्यांग समन्वय समितीने जागतिक अपंग दिनी उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हा रुग्णालयात दिव्यांगाना प्रमाणपत्र घेताना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिव्यांगांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार दिव्यांगांचे प्रलंबित मागण्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०८-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी ठिय्या आंदोलन करण्यापुर्वी जिल्हा दिव्यांग समन्वय समितीचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांचे समुपदेशन केले असून समुपदेशनाद्वारे त्यांचे सर्व शंकांचे निराकरण केल्याने दिव्यांग समितीच्या पदाधिकारी यांनी प्रस्तावित ठिय्या आंदोलन रद्द केले.

जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे दिव्यांगांची तपासणी आठवड्यातील दर बुधवारी संबंधित विशेष तज्ञाकडून करण्यात येऊन अंतिम तपासणी वैद्यकीय मंडळामार्फत करण्यात येते. अंतिम रुग्णांची तपासणी होईपर्यंत सदर दिवशी मंडळ कार्यरत असते. मार्च व एप्रिल २०१९ मध्ये आठवड्यातून दोन वेळा बुधवार व शुक्रवार या दोन दिवशी दिव्यांगांची गैरसोय होऊ नये म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या आदेशानुसार दिव्यांगांची तपासणी करून प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे पिळंजे अनगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे घरकुल योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३) २३६ (१२-०४-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिळंजे अनगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे खोट्या घरपट्या व आदिवासी विकास मंडळातर्फे मिळणाऱ्या योजनेमधील घरकुल योजनेच्या कामात गैरव्यवहार केल्याचे स्थानिक ग्रामस्थ यांनी मा.मुख्यमत्री व कोकण आयुक्त यांच्या भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत अभिलेखात फेरफार करणे, घरपट्टी पावतीत खाडाखोड करणे, एकाच नंबरचे दोन वेगवेगळे पुस्तके ग्रामसेवक यांनी वापरल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०१-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) श्री. अनिल वामन पाटिल, ग्रामसेवक, पिळंझे यांची खातेनिहाय चौकशी करण्यापूर्वी ज्ञापन व जोडपत्र १ ते ४ बजावणेत आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

संतवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतीच्या कामात झालेला गैरव्यवहार

(४) ७६८ (०९-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संतवाडी (ता.जुन्नर,जि.पुणे) येथे सन २०१० ते २०१५ या कालावधीत प्राथमिक शाळा दुरुस्ती, ग्राम सचिवालय बांधकाम, ग्रामसचिवालय, उर्वरित बांधकाम, पाझर तलाव, व्यायाम शाळा आणि सामाजिक सभागृह यांचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करुन तेथील ग्रामपंचायतीने ठेकेदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद अधिकारी, विस्तार अधिकारी यांच्या संगणमताने मोठया प्रमाणात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावचे तत्कालिन सरपंच सौ.स्मिता ज्ञानेश्वर पाडेकर यांची बनावट स्वाक्षरी करुन सदर ग्रामपंचायत खात्यावरील ६,८३,००० रुपये ग्रामसेवक यांनी काढलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषी व्यक्तींवर तातडीने कारवाई करावी म्हणून तत्कालिन सरपंच सौ.स्मिता ज्ञानेश्वर पाडेकर यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास सचिव, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे, गटविकास अधिकारी, जुन्नर यांना निवेदन सन २०१७ आणि २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करावी असे आदेश मा.ग्रामविकास मंत्री यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे गटविकास अधिकारी, जुन्नर आणि गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांना दिले होते, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांनी याबाबतीत कोणतीही कार्यवाही न करता सदर प्रकरणात गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदार संबंधित अधिकारी यांना मदत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. हसन मुश्रीफ (०१-१२-२०२०) : (१) नाही.

सद्यस्थितीत सदरील सर्व कामे पुर्ण असून सुस्थितीत आहेत. उप अभियंता (बांधकाम) आणि शाखा अभियंता (छोपावि) यांनी दिनांक ११.२.२०२० रोजी सदरील सर्व कामांची समक्ष पाहणी केली असता, सर्व कामे पूर्ण व सुस्थितीत असल्याचे दिसून आले आहे.

(२) नाही.

ग्रामपंचायत संतवाडी यांचे १४ व्या वित्त आयोगाच्या खात्यातून रेखांकित धनादेशाने ठेकेदार श्री.प्रकाश बाजीराव सहाणे यांना रू. ६,८३,००/-इतकी रक्कम अदा करण्यात आलेली होती. तथापि कामे सुरू न केल्याने त्यांच्याकडून दि. ३०.७.२०१८ रोजी आरटीजीएस व्दारे रक्कम रूपये ६,८३,०००/- ग्रामपंचायतच्या १४ व्या वित्त आयोगाच्या खात्यावर जमा करून घेतले आहेत.

या आर्थिक अनियमिततेसाठी तत्कालीन ग्रामसेवक श्री. विजय मारूती रोकडे व तत्कालीन सरपंच सौ. स्मिता ज्ञानेश्वर पाडेकर यांचेवर जबाबदारी निश्चित करून भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४९० व ३४ अन्वये दि. ७.९.२०१८ रोजी एफ.आय.आर नं.०२०६/२०१८ नुसार आळेफाटा पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) होय.

(४) होय

(५) व (६) या प्रकरणी विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती जुन्नर व गट विकास अधिकारी पंचायत समिती जुन्नर यांनी वेळोवेळी चौकशी करून संबंधितावर उत्तराच्या भाग-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिस्तभंग कारवाई केलेली आहे.

रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा रुग्णालयातील विविध समस्यांबाबत

(५) ८२९ (१३-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा रुग्णालयात अनेक समस्या उद्‌भवत असल्यामुळे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक १ मे, २०१९ रोजी रुग्णालयाला भेट देऊन सर्व्हे करुन रुग्णालयातील छोटी-मोठी २४ कामे तात्काळ करण्याबाबत सुचविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सुचविलेल्या कामांमध्ये पत्र्याची शेड, रस्त्यांवरील खडडे भरणे, कॉक्रीटीकरण, नळ व्यवस्था सुधारणे, पार्किंग व्यवस्था ड्रेनेज व्यवस्था, छताच्या गळत्या काढणे, जिन्याला रेलिंग बसवणे आदि कामे सुचविण्यात आलेली असताना आतापर्यत एकच काम झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कामे सुचवूनही अद्याप फक्त एकच काम झाले असून उर्वरित कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, जिल्हा रुग्णालयात डायलेसिस यंत्रणा बसविण्यात आली आहे परंतु वातानुकुलित यंत्रणा नसल्याने ही डायलेसिस युनिट बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२३-११-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.
जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे छोटी-मोठी एकूण ३५ कामे सुचविण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.
(३) एकूण ३५ कामांपकी २१ कामे पूर्ण झाली असून १२ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित २ कामे रद्द करण्यात आली आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

औसा व निलंगा तालुक्यातील ग्रामीण रस्ते व पुलांची दुरुस्ती करणे बाबत

(६) १०८६ (१३-०४-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा विधानसभा मतदार संघातील ग्रामीण रस्ते खराब झाल्याने हसाळा ते जमालपूर, आलमला ते उंबडगा रस्ता आदि स्त्यावरील पूल वाहून गेल्याने काही ठिकाणी कमकुवत झाल्याने वाहतुकीस धोकादायक झाल्याबाबत तसेच अत्यंत खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती व पुलांची पुनर्बांधणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, औसा यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी तहसील कार्यालय औसा येथे झालेल्या व मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे झालेल्या आढावा बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औसा विधानसभा मतदार संघातील रस्ते अत्यंत खराब झाले असून वाहतुकीस गैरसोयीची झाली आहेत तसेच अनेक रस्त्यावरील पूल वाहून गेली असून कमकुवत झालेली असल्याने वाहतुकीस धोकादायक झालेली आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील अत्यंत खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत व वाहून गेलेली व धोकादायक झालेल्या पुलांची दुरुस्ती व आवशकतेनुसार पुर्नबांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हासाळा ते जमालपूर रस्ता-सदर रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र.११६ दर्जाचा असून लांबी ४.३०० कि.मी.आहे. ०/०० ते ३/५०० हया लांबीत खड्डे असल्याने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. ३/५०० ते ४/३०० ही लांबी सार्वजनिक बांधकाम उपविभाग औसा यांच्याकडून दुरुस्त करण्यात आलेली आहे. सदर रस्त्यावर कि.मी.३/०० वर सहा व्हेंटचा पूल असून तो सन २०१८-१९ च्या

पावसामध्ये वाहून गेलेला आहे. सदर पुलाच्या दुरुस्तीकरिता रु.२०.०० लक्ष निधी आवश्यक असून दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

आलमला ते उंबडगा रस्ता-सदर रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र.९९ दर्जाचा असून त्याची लांबी ३४.०० कि.मी.आहे. पूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून त्यापैकी औसा ते सत्ताधरवाडी मोड कि.मी.३.५०० हा भाग मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत प्रगतीपथावर आहे. तसेच सत्ताधरवाडी मोड ते आलमला गावापर्यंत कि.मी.३.५०० ही लांबी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये प्रस्तावित आहे. त्यापुढील कि.मी. १.२०० लांबी जिल्हा परिषदे अंतर्गत पूर्ण करण्यात आलेली आहे.

आलमला ते उंबडगा या भागामधील कि.मी.८/०० वर दगडी बांधकामाचा जुना पूल वाहून गेलेला आहे. सदर पूल बांधकामासाठी रु.८५.०० लक्ष निधीची आवश्यकता असून सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) सदरील अत्यंत खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्याकरिता रु.५९८.४० लक्ष निधीची आवश्यकता असून त्यावरील पुलांच्या दुरुस्तीसाठी रु.२८५.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव विधानसभा मतदार संघातील सर्व लघु पाटबंधारे विभागांतर्गत (स्थानिक स्तर) कालवे नादुरुस्त असल्याबाबत

(७) २५५४ (११-०४-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव विधानसभा मतदार संघातील सर्व लघु पाटबंधारे स्थानिक स्तर अंतर्गत बांधण्यात आलेल्या तलावातील पाणी शेतकऱ्यांना पाट/ कालव्याद्वारे वितरीत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे एकूण किती तलाव असून किती तलावातून पाणी वितरीत केले जाते,

(३) असल्यास, नादुरुस्त कालवे दुरुस्तीबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे किती वेळा प्रस्ताव सादर केला,

(४) अद्याप प्रस्ताव सादर केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत, तसेच नादुरुस्त कालवे दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. शंकरराव गडाख (०३-१२-२०२०) : (१) हे खरे नाही. खामगांव विधानसभा मतदारसंघात एकाही तलावावर पाट/कालव्याद्वारे शेतकऱ्यांना पाणी वितरीत करण्यात येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील बंदी असलेल्या भागातील रुग्णांना नेण्याकरिता वाहन व्यवस्था नसल्याबाबत

(८) २७१५ (१३-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड), श्री.मदन येरावार (यवतमाळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील बंदी असलेल्या भागात आरोग्य यंत्रणा योग्य नसल्याने रुग्णांना उमरखेड किंवा नांदेड येथे नेण्याकरिता वाहन व्यवस्था नसल्याने अनेकांना प्राण गमवावे लागल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ वाहन व्यवस्था उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२३-११-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) उमरखेड तालुक्यात १ ग्रामीण रुग्णालय व ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. ग्रामीण रुग्णालयात २ रुग्णवाहिका व प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक रुग्णवाहिका कार्यान्वित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) प्राथमिक आरोग्य केंद्रावर औषधे उपलब्ध नसल्याबाबत

(९) ३२३९ (१३-०४-२०२०). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.यशवंत माने (मोहोळ) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गरीब व गरजू रुग्णांच्या औषधोपचारात अडचणी येऊ नयेत यासाठी शासनाने जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु केली असून या आरोग्य केंद्रामध्ये ४२९ हून अधिक प्रकारच्या गोळया, औषधाचा साठा असतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या अनेक महिन्यांपासून गोवेली, टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) नजीक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधांचा तुटवडा असल्याचे सांगून रुग्णांना ठराविक प्रकारच्याच गोळया व औषधे देऊन परत पाठविले जात असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औषधे उपलब्ध नसल्यामुळे तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना बाहेरुन स्वखर्चाने औषधे आणावी लागत असल्याच्या तक्रारी रुग्णालय प्रशासनाकडे केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१०-११-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

गोवेली टिटवाळा नजीक (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत नसून ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. सदर रुग्णालयात अत्यावश्यक व इतर पूरक औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
(३) हे खरे नाही.

सदर रुग्णालयात रुग्णांना आवश्यकतेनुसार रुग्णालयातुनच औषधांचा पुरवठा निशुल्क करण्यात येतो. तसेच रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागत असल्याबाबतची कोणतीही तक्रार जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांना प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील कृषि विभागातील वसुंधरा पाणलोट शाखेतील उर्वरित कर्मचा-यांना शासकीय सेवेत समाविष्ट करणेबाबत

(१०) ३८५६ (१६-०४-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील कृषि विभागातील वसुंधरा पाणलोट शाखेतील उर्वरित कर्मचा-यांना शासकीय सेवेत समाविष्ट करणेबाबत शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (२०-११-२०२०) : (१) होय.
(२) पंतप्रधान कृषि सिंचन योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार कोणतेही कायमस्वरुपी मनुष्यबळ निर्माण करता येणार नाही. तसेच केंद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालय भूमी संसाधन विभाग यांच्या दिनांक ०२.०२.२०१७ च्या पत्रान्वये उपलब्ध मनुष्यबळाचा सुयोग्य वापर करण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण भागातील काही शाळेचे विज कनेक्शन जिल्हा परिषदेच्या वतीने तोडण्यात आल्याबाबत

(११) ४०२५ (१६-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या वतीने २ हजार ७९९ शाळांपैकी ७६५ शाळांचे वीज कनेक्शन हे ७८ लाखांची थकबाकी असल्याने तोडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळांकडे वीज बिल भरण्याची तरतूद नसून ग्रामपंचायत प्राथमिक शाळांचे विज बिल न भरल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक ग्रामपंचायतीला वीज बिल भरण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत आदेश देवूनही विज बिल भरले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-१२-२०२०) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वीज बील समग्र शिक्षा अभियान शाळा अनुदान, ४% सादील शाळा अनुदान, १४ व्या वित्त आयोगातून वीज बील भरण्यात येतात. सदर अनुदानाच्या उपलब्धेनुसार वीज बीलाचा भरणा तातडीने करण्याचे संबंधितांना जिल्हा परिषदेमार्फत निर्देश देण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर जिल्हा रुग्णालयात गरजू लोकांवर उपचार होत नसल्याबाबत

(१२) ४०४५ (२५-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यातील मोठे तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे खास बाब म्हणुन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे तसेच माढा, करकंब, कुर्डूवाडी येथील ग्रामीण रुग्णालये मंजूर आहेत, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, जिल्हा उप रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव व सांडपाणी शौचालयाच्या बाहेर येत असून महिलांचे वार्ड अस्वच्छ असणे, रुग्णालयात पिण्यासाठी पाणी नसणे, महिलेची प्रसूती होते तेव्हा त्या नवजात अर्भकाला त्यांच्या नातेवाईकांकडे देऊन त्याला स्वच्छ करून आणून दया असे सांगण्यात येत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील वर्षी बाह्यरुग्ण, आंतररुग्ण, प्रसुती, डायलेसीस असे जवळपास लाखो रुग्णांवर उपचार करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय.
(४) असल्यास उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर, प्रयोगशाळा सहायक, इसीजी तज्ञ, वर्ग चारचे कर्मचारी असे अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रुग्णांना अधिक सुविधा मिळणे तसेच रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०३-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

चतुर्थश्रेणी कर्मचायांकडून उपजिल्हा रुग्णालयाची नियमितपणे स्वच्छता करुन घेतली जाते. पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ.प्लण्टची व्यवस्था करण्यात आली आहे. नवजात अर्भकाला उपलब्ध सर्व सुविधा पुरविल्या जातात व आवश्यकता भासल्यास वरिष्ठ शासकीय रुग्णालयात संदर्भित करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

मागील वर्षी बाह्यरुग्ण विभागात १,२८,७९५ रुग्णांना व आंतररुग्ण विभागात १०,०८५ रुग्णांना विविध सेवा देण्यात आलेल्या आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय व तीन ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षकाची ३, वैद्यकीय अधिकारी व प्रयोगशाळा तंत्रज्ञाची प्रत्येकी ४, ईसीजी तंत्रज्ञाचे १ व वर्ग-४ ची २३ पदे रिक्त आहेत.

(५) वैद्यकीय अधीक्षक संवर्गातील पदे पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्यासाठी शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. गट-क संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु असून सरळसेवेने पदे भरण्यासाठी दिनांक २४.०२.२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मेळघाट क्षेत्रातील रुग्णालयात अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी यंत्र सामुग्री पुरविण्याबाबत

(१३) ४४०३ (२४-०७-२०२०). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट क्षेत्रात ११ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३ ग्रामिण रुग्णालय व इतर रुग्णालय कार्यरत असून या ठिकाणी नादुरुस्त रुग्णवाहिका असून आदिवासी भागातील दळण - वळणाचा भौगालिक परिस्थितीचा विचार करता या क्षेत्रात प्रत्येकी एक व ग्रामिण रुग्णालयात प्रत्येकी ०२ रुग्णवाहिका व तसेच आदिवासी रुग्णांना स्थानिक रुग्णालयात अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी यंत्र सामुग्री पुरविण्याबाबत अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०९-१२-२०२०) : (१) व (२) हे खरे नाही.

मेळघाट क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र / प्राथमिक आरोग्य पथके / फिरती पथके अशा २३ आरोग्य संस्थांना ३४ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. उपजिल्हा रुग्णालयात ३ तर २ ग्रामीण रुग्णालयांना प्रत्येकी २ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त मेळघाट क्षेत्रात १०८ अंतर्गत ६ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत. तसेच रुग्णालयामध्ये आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. तसेच यंत्र सामुग्रीसाठी डीपीडीसी व राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते व साधनसामुग्री खरेदी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पुरातन मंदिरे व वास्तु यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी
निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१४) ४७५९ (२०-०३-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक पुरातन मंदिरे व वास्तु या जीर्ण व जुन्या झाल्यामुळे पडझड स्थितीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुरातन मंदिरे व वास्तुंची वेळेवर देखभाल दुरुस्ती व डागडुजी होत नसल्यामुळे तसेच यापैकी बहुतांश मंदिरे व वास्तु त्या ब्रिटीश काळात बांधलेल्या असल्याने या वास्तू नष्ट होण्याची तसेच पावसामुळे वा इतर कारणांमुळे या वास्तु कोसळून दुर्घटना होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुरातन मंदिर व वास्तु यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी तात्काळ निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२८-११-२०२०) : (१) हे अंशतः खरे आहे.

या विभागाने महाराष्ट्र राज्यातील एकूण ३७७ स्मारके ही राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केली आहेत. या अंतर्गत ५१ किल्ले व इतर वास्तु राज्य संरक्षित स्मारक आहेत.

(२) हे खरे नाही.

काही पुरातन वास्तु पडझड होण्यापूर्वीच राज्य संरक्षित स्मारक घोषित करुन या स्मारकांची जतन दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने करण्यात येतात.

(३) शासनाने सन २०१५ पासून २८ राज्य संरक्षित किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाची महत्वकांक्षी योजना हाती घेतली आहे. सदर २८ किल्ल्यांच्या जतन दुरुस्तीकरिता एकूण

रु.१३४.८८ कोटी रकमेच्या कामांना प्रशासकीय मंजूरी मिळाली असून रु.८४.६९ कोटी इतका निधी खर्च झाला आहे. तसेच इतर वास्तु व मंदिरांच्या जतन व संवर्धन आवश्यकतेनुसार शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात सन २०१४ ते २०१९ या कालावधीत मंजूर असलेल्या विकास कामांना दिलेल्या स्थगितीबाबत

(१५) ४७८६ (१०-०४-२०२०). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागाचा विकास होण्याच्या दृष्टीकोनातून राबविल्या जाणा-या कल्याणकारी योजनेच्या माध्यमातून सन २०१४ ते २०१९ या कालावधीत मंजूर असलेल्या विकास कामांना शासनाने दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थगिती दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मंजूर विकास कामांना दिलेली स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०१-१२-२०२०) : (१) अंशतः खरे आहे. ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी शासनाने वितरीत केलेल्या निधीपैकी ज्या कामांचे कार्यारंभ आदेश अद्याप देण्यात आलेले नाहीत अशा कामांना शासनाच्या ग्रामीण विकास विभागाच्या दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकांन्वये स्थगिती देण्यात आलेली आहे.
(२) सन २०१९-२० मधील मंजूर कामांपैकी ज्या कामांचे कार्यारंभ आदेश झाले नाहीत, अशी सर्व कामे शासनाच्या निर्देशानुसार रद्द करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर ३ येथे अपंगांना अपंगांचा दाखला मिळण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

(१६) ४७८९ (२२-०३-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर ३ येथे डॉक्टर व कर्मचारी कमी असल्याने अपंगाना दाखले वेळेवर मिळत नसल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील विविध भागातून हजारो रुग्ण येत असून तेथील डॉक्टर उशिरा येत असल्यामुळे अनेक अपंगांना दिवसभर थांबावे लागत असल्याने जिल्हा रुग्णलयातील कारभाराबाबत संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर ३ या रुग्णालयाची झालेली दुरवस्था, वैद्यकीय उपकरण यांचा अभाव, अस्वच्छता, डॉक्टर आणि कर्मचारी यांची रिक्त पदे यामुळे रुग्णालय अडचणीत आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी आणि रुग्णालय यांनी शासनाकडे वारंवार रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०८-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

दिनांक २५.१२.२०१९ रोजी शासकीय सुट्टी असल्याने दिव्यांग प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले नाही. मात्र दर बुधवारी दिव्यांग प्रमाणपत्र वितरीत करण्यात येतात.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील पदे शासन स्तरावरून पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया तसेच सरळसेवेने भरण्यासाठी शासन स्तरावरून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून पद भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच गट-क संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरू आहे व सरळसेवेने पदे भरण्यासाठी दिनांक २४.०२.२०१९ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून कार्यवाही सुरू आहे. सदर रुग्णालयाच्या दुरूस्तीचे काम सुरू असून रुग्णालयातील सर्व विभाग व आवार नियमीतपणे स्वच्छ केले जाते तसेच एक्स रे, सोनोग्राफी, डायलिसीस इ. यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वीत आहेत आणि नवीन सी.टी. स्कॅन मशीनचे इन्स्टॉलेशन देखील करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्हयाचा विकास करण्याकरीता अभ्यास गटाची निर्मिती करणेबाबत

(१७) ५१२७ (०९-०४-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी शासनाकडून प्राप्त होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त होवूनही जिल्हयाचा विकास होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयाचा विकास होत नसल्याने त्या कारणांचा शोध घेण्यासाठी संशोधन समिती निर्माण करून अभ्यास गटाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (०७-१२-२०२०) : (१) गडचिरोली जिल्हयास जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२१ अंतर्गत रुपये २५६.४० कोटी (आकांक्षित जिल्हयांसाठीचा २५% निधी धरुन) इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त गडचिरोली जिल्हयास अनुसूचित जाती घटक कार्यक्रम, आदिवासी घटक कार्यक्रम, बाहय आदिवासी घटक कार्यक्रम तसेच केंद्र शासनाकडून नक्षलग्रस्त भागाकरीता केंद्राचे विशेष सहाय्य (Special Central Assistance) उपलब्ध करुन दिले जाते. राज्य शासनाकडून देखिल राज्य स्तरावरुन आवश्यक निधी गडचिरोली जिल्हयाकरीता उपलब्ध करुन दिला जातो.
(२) हे खरे नाही.
(३) गडचिरोली जिल्हयाच्या विकासाकरीता आवश्यक निधी केंद्र शासन व राज्य शासनाकडून उपलब्ध करुन दिला जात असल्याने संशोधन समिती निर्माण करुन अभ्यासगटाची निर्मिती करण्याबाबत कोणताही प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधिन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दुधपुरी (ता.अंबड, जि.जालना) येथील शेततळयात दोन शाळकरी मुलांचा बुडून मृत्यू झाल्याबाबत

(१८) ५३४७ (२५-०३-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुधपुरी (ता.अंबड, जि.जालना) येथील शेततळयात दोन शाळकरी मुलांचा बुडून मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शेततळयात मृत पावलेल्या मुलांच्या कुटुंबियांना शासनाकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख (०९-१२-२०२०) : (१) हे खरे आहे. मौजे दुधपरी ता.अंबड जि.जालना दुधपुरी शिवार गट क्रमांक २०८ मधील शेत तळयात दोन शाळकरी मुलांचा बुडून मृत्यु झालेला आहे.

(२) होय, सदर बाबत पोलीस ठाणे अंबड येथे आ मृ क्रं. ८३/२०१९ कलम १७४ सीआरपीसी प्रमाणे दिनांक २९/१२/२०१९ अन्वये अकस्मात मृत्युची नोंद दाखल केली असून सदर प्रकरणात चौकशी करण्यात आलेली आहे.
(३) सदर प्रकरणात शेततळया मध्ये मृत पावलेल्या मुलांच्या कुटुंबियांना शासनाकडून आर्थिक मदत मिळविण्याची कार्यवाही होणेकरीता ते शिक्षण घेत असलेल्या सरस्वती माध्यमिक विद्यालय पानेगाव व जिल्हा परिषद माध्यमिक शाळा दुधपुरी या दोन्ही शाळेच्या मुख्याध्यापकांना मयत मुलांच्या कुटुंबीयांना आर्थिक लाभ मिळणेसाठी राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत मदत मिळवून देणेकरीता कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

औसा (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांची जनावरे चोरीस जात असल्याबाबत

(१९) ५३९९ (२५-०३-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील गायी, म्हशी व बैल चोरीस जाण्याची प्रकरणे वाढल्याने शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे व माहे ऑक्टोबर, २०१९ ते माहे जानेवारी, २०२० या कालावधीत औसा तालुक्यातील शेकडो जनावरे चोरीस गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनावरे चोरीस गेल्याबाबत औसा तालुक्यातील किती शेतकऱ्यांच्या तक्रारी पोलीस स्टेशन औसा यांच्याकडे दाखल आहेत व सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, तपासात काय निष्पन्न झाले व त्यानुसार गुन्हेगारांना अटक करून कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना त्यांची चोरीस गेलेली जनावरे परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख (०९-१२-२०२०) : (१) माहे ऑक्टोवर २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीत ३ म्हशी व २ गायी अशी ५ जनावरे चोरीस गेली आहेत.
(२) माहे ऑक्टोवर २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीत याबाबत ४ तक्रारी पोलीस स्टेशन औसा येथे प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन औसा येथे ०४ गुन्हे दाखल झाले असून दाखल झालेले सर्व गुन्हे उघडकिस आलेले आहेत.
(३) व (४) पोलीस स्टेशन औसा येथे गु. र. क्र. २७५, २९६, ३२१,३२५/१९ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असून ३ आरोपीस अटक करून त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या जनावरांपैकी २ गायी जप्त करण्यात आलेल्या आहेत. अधिक तपास सुरू आहे.

रोहयातील कुंडलिका नदीवरील रिव्हर राफ्टिंगबाबत

(२०) ५४१६ (११-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोह्यातील कुंडलिका नदीवरील रिव्हर राफ्टिंग लघु पाटबंधारे विभागाच्या कोलाऊ शाखेने दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी बंद करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्याप्रकारे आदेश देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. जयंत पाटील (१३-११-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.
(२) कंत्राटदाराने कायदेशिर कारारनाम्यातील अटीनुसार वार्षिक भाड्याची रक्कम विभागात न भरल्याने अंतिम उपाय म्हणून रिव्हर राफ्टींग बंद करण्याचे आदेश विभागाकडून देण्यात आले होते.
(३) दि.१८/१/२०२० पासून दि.३१/१/२०२० या कालावधीत नौकानयन बंद करुन दि.१३/२/२०२० रोजी संपूर्ण वार्षिक भाडे रु.५०,४२,४७३/- कंत्राटदाराकडून वसुल करण्यात आली आहे.

पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात जलसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(२१) ५९०८ (१०-०४-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून झालेल्या जलसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०३-१२-२०२०) : (१) व (२) हे खरे नाही. तथापि, पुरंदर तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानाच्या कामासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कृषि सहसंचालक, मृदसंधारण तथा सह मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने चौकशीची कार्यवाही पूर्ण केली असून संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर अनुषंगिक पुढील प्रशासकीय कारवाई महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या तरतूदीनूसार सुरू आहे. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसुलपात्र रक्कम वसुलीची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वावी-शहा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे ओएफसी केबल टाकण्यासाठी ठेकेदाराने वीनापरवानगी रस्त्याच्या साईडपट्टी खोदकाम केलेबाबत

(२२) ६६७० (११-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वावी-शहा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे ओएफसी केबल टाकण्यासाठी ठेकेदाराने विना परवानगी रात्रीच्या वेळेत रस्त्याच्या साईडपट्टी खोदकाम करुन रस्त्याची दुर्दशा करण्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओएफसी केबल टाकण्यासाठी पक्के रस्ते खोदकाम करताना पूर्ववत जैसे थे करुन देण्याची जबाबदारी मक्तेदार एजन्सीची असताना मक्तेदाराकडुन फक्त केलेले खोदकाम बुजविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये ठेकेदार व पंचायत समितीच्या अधिका-यांच्या संगनमताने हा प्रकार होत असल्याने या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.

(२) केबल टाकण्यासाठी केलेले खोदकाम हे साईड पट्टी मध्ये केलेले आहे व काम झाल्यानंतर साईड पट्टी पूर्ववत करण्यात आली आहे. तसेच संबंधित एजन्सीव्दारे खोदकाम करण्यात आलेल्या रस्त्याची दुरुस्ती करुन देण्यात आली आहे.

(३) सदर कामाची परवानगी शासन स्तरावरुन देण्यात आलेली आहे.तथापि, काम सुरु करण्यापूर्वी संबंधितांकडून पंचायत समिती वा जिल्हा परिषदेस कळविण्यात आले नाही. ही बाब निदर्शनास आल्यानंतर जिल्हा परिषदेने संबंधित यंत्रणेची सुनावणी घेऊन भविष्यात परस्पर काम करु नये, अशा सूचना एजन्सीस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे सीटी स्कॅन करिता रूग्णांना प्रतिक्षा करावी लागत असल्याबाबत

(२३) ६७६५ (१४-०३-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे सीटी स्कॅन करिता रूग्णांना २० दिवस प्रतिक्षा करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाचे वैद्यकीय संचालक यांनी सीटी स्कॅन रूग्णांची प्रतिक्षा यादी संपविण्याचे आदेश देवूनही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सीटी स्कॅनचे अहवाल रूग्णांना मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२३-११-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) सीटी स्कॅन चाचणी करिता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी निर्देश दिलेल्या कार्यपध्दतीनुसार रुग्णपरत्वे सीटी स्कॅन चाचण्या करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियांनामार्फत मंजूर निधी प्राप्त होण्यास होत असलेला विलंब

(२४) ६८९५ (१३-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मंजूर निधी प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी वर्षभरासाठी असलेला निधी हा शेवटच्या २-३ महिन्यामध्ये प्राप्त होतो आणि तो खर्च तातडीने करावा लागत असल्याने त्याचा दर्जा राखण्यासाठी अधिका-यांना अत्यंत अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा मंजूर निधी त्वरीत वितरीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०२-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निधी हा तांत्रिक अडचणीमुळे जरी शेवटच्या २-३ महिन्यात प्राप्त झाला तरी, सदर निधी व्यपगत न होता पुढील आर्थिक वर्षामध्ये चालू वर्षाच्या मंजूर कार्यक्रमाकरिता वापरण्याची परववानगी आहे. त्यामुळे तातडीने खर्च करुन त्याचा दर्जा राखण्यासाठी अधिकाऱ्यांना अडचणी येत असल्याचे खरे नाही.
(३) राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा मंजूर निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत
हायमास्ट दिवे खरेदीबाबत

(२५) ६९५६ (१६-०४-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभागातर्फे ग्रामीण भागात हायमास्ट दिवे खरेदीच्या निविदा प्रक्रियेत मंजुरीच्या मुद्द्यावरून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि लेखा व वित्त अधिकारी यांच्यामधील मतभेदांमुळे रखडली असल्याची घटना दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतींना स्वतंत्र अधिकार असताना जिल्हा स्तरावर निविदा काढली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखा व वित्त अधिकारी यांना नोटीस काढली असून सदर निविदा प्रक्रिया राबवताना विहित लेखा संहितेचा वापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०४-११-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद सोलापूर येथील समाज कल्याण विषय समिती सभा दिनांक २५.१०.२०१८ मध्ये ग्रामपंचायत स्तरावर अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे (दलित वस्ती सुधार योजना) याबाबत चर्चा होऊन सदर योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर वेगवेगळ्या दराने टेंडर अंतीम केले जात असल्याने त्यात होणारी अनियमितता लक्षात घेता शासन दरकराराप्रमाणे जिल्हा स्तरावर निविदा करावी असा निर्णय झाला. तथापि, जिल्हा परिषदेच्या दि.२१.११.२०१९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत सदर निर्णय रद्द करून निविदा प्रक्रीया पूर्ववत त्या त्या ग्रामपंचायत स्तरावर करण्याचा निर्णय झाला असून तसे सर्व गट विकास अधिकारी यांना दि. १०.१२.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.
(३) सदर प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखा व वित्त अधिकारी यांना नोटीस काढलेली नाही. तसेच या प्रकरणी विहित लेखा संहितेचा वापर करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयातील छोटे पाटबंधारे विभागाकडील निविदांची चौकशी करण्याबाबत

(२६) ७०९३ (१६-०४-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील छोटे पाटबंधारे विभागाकडील निविदांची चौकशी करावी, प्रभारी कार्यकारी अभियंता यांना सक्तीच्या रजेवर न पाठविता त्यांच्या कार्यकाळातील कामांची खातेनिहाय चौकशी करावी असा ठराव सांगली जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीमध्ये झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्हा परिषदेत जलव्यवस्थापन तसेच स्वच्छता समितीचे सभा झाली यामध्ये वनविभागातील, ग्रामपंचायत स्तरावर शौचालय बांधण्यासंदर्भात जागृती करण्याबाबत तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील अपूर्ण विहीरींची तालुकानिहाय माहिती सादर करण्याच्या सूचना , राष्ट्रीय जलजीवन योजनेतून सांगली जिल्हयातील प्रत्येक गावात किमान एक विंधन विहीर घेण्याबाबतचा प्रस्ताव असे विषय घेण्यात आले असुन याबाबत योग्य कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१८-११-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची दिनांक १.१.२०२० रोजी तहकुब झालेली सभा दिनांक २२.१.२०२० रोजी झाली. सदर सभेमध्ये खालीलप्रमाणे सूचना करण्यात आल्या असून, त्या सूचना संबंधित विभागांकडे पाठवून त्यावर उचित कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.

१) वन विभागाने लागन केलेल्या रोपांपैकी जिवंत रोपांची माहिती, त्यासाठी झालेल्या खर्चाची माहिती जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत देणे.

२) स्वच्छ भारत अभियान कामकाजांतर्गत सन २०२१ च्या राष्ट्रीय जनगणना सर्वेमध्ये ज्या कुटुंबांकडे शौचालये उपलब्ध नाहीत त्यांना ग्रामपंचायत स्तरावर पत्र देवून जनजागृती करणे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील अपूर्ण विहीरींची कामे पूर्ण करणेसाठी अपूर्ण कामांची यादी जिल्हा परिषद सदस्य व सभापती यांना देणे

४) राष्ट्रीय जलजीवन योजनेतून प्रत्येक गावांमध्ये १ विंधन विहीर घेणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्ह्यात बोगस डॉक्टरांच्या उपचारात रुग्णांचा झालेला मृत्यू

(२७) ७३७० (१३-०४-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात बोगस डॉक्टर असल्याचे माहे नोव्हेंबर - डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त बोगस डॉक्टरांच्या उपचारात ३० रुग्ण दगावले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार बोगस डॉक्टरांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२७-११-२०२०) : (१) अंशत खरे आहे.
(२) नाही.
(३) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात अहमदनगर जिल्ह्यामधील श्रीगोंदा तालुका -१, संगमनेर तालुका-२ बोगस वैद्याकिय व्यवसायिकांवर धाडी टाकुन संबंधित पोलिस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच कोपरगाव तालुक्यातील-१ बोगस वैद्यकीय व्यवसायिकास ३ वर्षे सक्तमजुरी व १००००/ रूपये दंडाची रिक्षा मा.न्यायालयाकडून झालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यातील ऐतिहासिक पांडव वाड्याची भिंत कोसळल्याबाबत

(२८) ७६६१ (१३-०४-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यातील ऐतिहासिक पांडव वाड्याची भिंत माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान कोसळली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारकाच्या जतन दुरुस्तीचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सहायक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक यांना संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अंदाजपत्रकास मान्यता मिळून निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२८-११-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर स्मारकाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आवश्यक असणारे खाणदर्शक अंतरे मिळविण्यासाठी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, एरंडोल यांना सहायक संचालक, नाशिक कार्यालयाने दि. २८.०७.२०२० रोजी विनंती केली आहे. तथापि, अद्याप माहिती अप्राप्त असल्यामुळे तसेच कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करण्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. याबाबत संबधितांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेंतर्गत रूग्णांना उपचारार्थ मिळणाऱ्या निधीची मर्यादा वाढविणेबाबत

(२९) १००३५ (२८-०५-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रूपये १ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या केशरी कार्ड धारक कुटुंबांना वैद्यकीय उपचारासाठी महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेंतर्गत रूपये १ लाख ५० हजारांचा निधी उपलब्ध करून देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील कर्करोग, मधुमेह, किडणी, हृदयविकार, इ. आजारांच्या रूग्णांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत असून या आजारावरील उचाराचा खर्च हा महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेतर्गत मिळणाऱ्या निधीपेक्षा अधिक असल्याने गरीब रूग्णांना या आजारावर उक्त योजनेतंर्गत उपचार घेणे शक्य होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब रूग्णांना आवश्यक वैद्यकीय उपचार वेळीच मिळणेकरिता शासनाने महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेतील निधीची मर्यादा वाढविणे आवश्यक असून त्यानुषंगाने शासन या योजनेतील निधीची मर्यादा ३ ते ४ लाख रूपयांपर्यत वाढविण्याचा निर्णय घेणार आहे काय,

(४) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले आरोगय योजनेतंर्गत मिळणा-या निधीची मर्यादा वाढविणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०८-१२-२०२०) : (१) होय.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुपये १ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या केशरी, पिवळी, अंत्योदय, अन्नपुर्णा कार्ड धारक कुटुंबांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये १.५ लक्ष इतकी विमा मर्यादा असून मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा प्रति कुटुंब प्रति वर्ष रूपये २.५ लक्ष आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष १.५ लक्षापर्यंत उपचार अनुज्ञेय असून प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत Socio- Economic Cast Census(SECC-२०११) नुसार राज्यात ८३.७२ लाख कुटुंबे असून या कुटुंबांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लक्ष रूपयापर्यंत उपचार अनुज्ञेय आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आशा सेविका यांच्या विविध मागण्यासंदर्भात

(३०) ११४७९ (१०-०९-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.रवि राणा (बडनेरा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), डॉ.पंकज भोयर (वर्धा), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.चंद्रकांत जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना विषाणूच्य संसर्गामुळे जाहिर करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात आरोग्य विषयक माहिती संकलनाचे प्रत्यक्ष काम करणाऱ्या आशा सेविका , अंगणवाडी सेविका मोबदल्यापासून वंचित असून त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ते साहित्य पुरवले गेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड साठी काम करणाऱ्या अशा सेविकांना राज्य सरकार च्या वतीने दिवसाला ३० रुपये देण्यात येत असून तुटपुंज्या वेतानामुळे अशा सेविकांनी काम बंद आंदोलन केले असून राज्य शासनाकडे महिना १० हजार रुपये मानधन मिळावे अशी मागणी अशा सेवकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत अशा सेविका, अंगणवाडी सेविका यांचे मानधन वाढवून किंवा विशेष भत्ता देण्याबाबत किंवा प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेमार्फत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास मागणी केली असून या संदर्भात शासनाला जिल्हाधिकारी, अमरावती यांनी पत्र क्रमांक ३६०/ २०२० दि.२१/०५/२०२० रोजी पत्र पाठविले आहे तसेच आशा सेविकांना शासकीय कर्मचा-यांचा दर्जा द्यावा यासह विविध मागण्यांसाठी शेगाव (जि.बुलडाणा) तालुक्यातील आशा सेविका कर्मचारी संघटनेच्यावतीने माहे मे २०२० मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उल्हासनगर मधील हजारो अशा सेविका रात्री काम करीत असून त्यांना रात्रीच्या वेळेत रुग्णालयामध्ये प्रसुतीसाठी राहावे लागत असल्याने रुग्णालयात राहण्याची व्यवस्था आणि मानधन यामध्ये १० हजार रुपये वाढ करावी अशी मागणी लोकप्रतिनधी यांनी राज्य सरकार कडे व ठाणे जिल्हा समितीच्या बैठकीत निवेदन द्वारे केली आह, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात आज सुमारे ७२ हजारा पेक्षा जास्त आशा सेविका व सुमारे ३५ हजार हून अधिक गटप्रवर्तक महिला कर्मचारी सार्वजनिक आरोग्य विभागातील राष्ट्रीय आरोग्य अभियांतर्गत काम करीत असून या कर्मचाऱ्यांना गावागावात आरोग्याबाबत सर्वेक्षण करणे, गरोदर मातांना प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन जाणे,शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात

मानसिक आजारांचे सर्वेक्षण करणे, लसीकरणास मदत,गाव व शहरी भागात क्षयरोग, कुष्ठरोग, कर्करोग, हत्तीरोग, मलेरिया, डेंग्यू, फ्लू व सध्या कोविड-१९ इत्यादी. साथीच्या रोगाचे सर्वेक्षण करावे लागत असून सदर कामाचा मोबदला म्हणून या कर्मचाऱ्यांना मासिक मानधन रु.१५००/- अधिक बैठक भत्ता रु. १००/- असे मासिक एकूण रु.१६००/-वेतन देण्यात येत असून त्याच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना मासिक रु.२००० वाढ करणारा आदेश शासनाने माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान काढला, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०८-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

आशा स्वयंसेविकांना सेंवांवर आधारित प्रोत्साहनात्मक मोबदला अदा करण्यात येतो. कोविड-१९ च्या सेवेसाठी दरमहा अतिरिक्त रु. १०००/- इतका तसेच इतर ७८ सेवांनुसार केंद्र शासनाने ठरविलेल्या दरानुसार मोबदला देण्यात येतो. आशा स्वयंसेविकांनी काम बंद आंदोलन केलेले नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(५) अंशत: खरे आहे.

नियमित ४ सेवेच्या मोबदल्यात केंद्र शासनाच्या समप्रमाणात आशा स्वयंसेविकांना रु. २०००/- व गटप्रवर्तकांना रु. ३०००/- दरमहा राज्य शासनामार्फत देणेबाबत दिनांक १७ जुलै, २०२० रोजी शासन निर्णय काढला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात करोना विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जाहिर केलेल्या "टाळेबंदी" च्या काळात राज्याचे झालेले महसुली नुकसान

(३१) ११५०५ (०८-०९-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक २२ मार्च, २०२० रोजीपासून सुरु असलेल्या टाळेबंदीमुळे राज्य शासनाचे माहे मे, २०२० अखेरपर्यंत सुमारे ५० हजार कोटी रुपये इतक्या महसुलाचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ५ मे,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टाळेबंदीमध्ये महसुली रक्कमेचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे किती निधीची मागणी केली आहे व अद्याप केंद्राकडून किती निधी शासनास प्राप्त झाला आहे,

(३) तसेच, राज्यात टाळेबंदीमुळे कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता शासनाने नेमलेल्या तज्ञांच्या विशेष अभ्यास समितीने आपला अहवाल शासनास दिनांक ९ मे,२०२० रोजी सादर केला असून सदर तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत व अहवालातील एकूण किती व कोणत्या शिफारशी स्विकारून त्यावर कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, महसूलातील तूट भरून काढण्यास किती कालावधी लागणार आहेत ?

श्री. अजित पवार (११-११-२०२०) : (१) दिनांक ०५ मे, २०२० रोजीच्या “लोकसत्ता” वर्तमानपत्रात “सरकारी कर्मचा-यांच्या बदल्या आणि भरतीवर बंदी” बाबत प्रसिध्द झालेल्या वृत्तामध्ये गेल्या तीन महिन्यात सरकारला सुमारे ५० हजार कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे नमूद आहे. तथापि, टाळेबंदीच्या कालावधीत मार्च २०२०, एप्रिल २०२० व मे २०२० या तीन महिन्यांतील राज्य शासनाच्या महसुली जमेची मागील वर्षातील मार्च २०१९, एप्रिल, २०१९ व मे, २०१९ या तीन महिन्यांतील महसुली जमेशी तुलना करता शासनाचे सुमारे रु.३८,१६६ कोटी इतक्या महसुलाचे नुकसान झाल्याचे दिसून येते.
(२) टाळेबंदीमुळे महसुली रकमेचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी मा.उपमुख्यमंत्र्यांनी दिनांक ३० मार्च, २०२० रोजी केंद्र शासनाकडून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राज्य शासनास केंद्रिय करांतील हिस्सा व केंद्र शासनाकडील सहायक अनुदानांचे कमी प्राप्त झालेले रु.१६,६५४ कोटी रूपये माहे ३१ मार्च, २०२० पर्यंत वितरीत करण्याची व महसुलाचे नुकसानापोटी रु.२५,००० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज देण्याची मागणी केंद्र शासनाकडे केली आहे. तसेच महसुलात आलेली तूट भरुन काढण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री यांनी दिनांक १७ एप्रिल, २०२० रोजी मा.पंतप्रधान महोदयांना वस्तु व सेवा कराची भरपाई प्रतिमाह देण्याबाबत व रु. १०,०००/- कोटीचे पॅकेज प्रतिमाह पुढील ५ महिने ५०,००० देण्याची विनंती केली आहे.

१ एप्रिल,२०२० पासून ३१ ऑगस्ट,२०२० पर्यंत केंद्रिय करांतील हिस्सा, सहायक अनुदाने,१५ व्या केंदीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निधी, केंद्र पुरस्कृत/सहायित योजनामधील केंद्र हिस्सा आणि वस्तु व सेवा कराच्या नुकसान भरपाईपोटीची रक्कम मिळून सुमारे ३१,७३६ कोटी रुपये केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झाले आहेत.
(३) कोविड-१९ संदर्भात सुरक्षिततेचे नियम पाळून कृषी, परिवहन, मत्स्य व्यवसाय, बांधकाम, असंघटीत कामगार, उद्योग, समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे इ. बाबीच्या शिफारशी केल्या आहेत.

राज्य शासनाकडून कर्मचाऱ्यांची सुरक्षितता सांभाळून आस्थापना, उद्योग सुरू करणे, वाहतूक सुरू करणे, मुद्रांक शुल्कात सवलत देणे, परिवहन उद्योगासंदर्भात सवलती देणे, कामगार कल्याण निधीतून मदत देणे ई. बाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(४) शासनाकडून तातडीने महसूलातील तूट भरून काढण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील वरुड ते जोगवाडा या गावांना जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था

(३२) ११६४४ (१७-०७-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील वरुड ते जोगवाडा या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता रहदारीचा असून या रस्त्यावर अपघात होण्याचे प्रमाण वाढल्याने ही बाब ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देखील याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जोगवाडा वरुड रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.४ दर्जाचा आहे. सदर रस्ता हा काळ्या मातीच्या भागातून जात असल्याने तसेच वरुड (नृ) गावात खदान असल्याने प्रामुख्याने खदानीच्या वाहनामुळे सदर रस्त्यावर खड्डे पडले आहेत. सदर रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता वाहतुकी योग्य करण्याबाबतची कार्यवाही जिल्हापरिषदेकडून करण्यात येत आहे. सदर रस्ता दुरुस्तीचा प्रस्ताव सन २०२०-२१ मध्ये जिल्हा नियोजन मंडळाकडे जिल्हा परिषदेमार्फत सादर करण्यात येत आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेसाठी नियुक्त केलेल्या सीएससी.एसपीव्ही ई गव्हर्नस इंडिया लिमिटेड या कंपनीने केलेला गैरव्यवहार

(३३) ११७२३ (०९-०७-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेसाठी नियुक्त केलेल्या सीएससी.एसपीव्ही ई गव्हर्नस इंडिया लिमिटेड या कंपनीने ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने नाशिक जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातील संगणक परिचालक यांचे मानधन दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीच्या कारभाराबाबत अनेक संघटनानी शासनाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहेत काय,

(४) असल्यास, कंपनीने पुरवठा केलेली ई ग्राम संगणक प्रणाली देखील बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सीएससी.एसपीव्ही ई गव्हर्नस इंडिया लिमिटेड या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०९-१२-२०२०) : (१) नाही.
(२) अंशत: खरे आहे,जून २०२० पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(३) होय.
(४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावांच्या रस्त्यांची झालेली दुरवस्था

(३४) ११७७३ (११-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील रस्त्यांवरील खडी निघून दुरवस्था झाल्याने सुमारे ५० गावांमध्ये अद्याप एस.टी. बसही पोहचली नाही त्यामुळे ग्रामस्थांची दळणवळणासाठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे.
(३) अतिवृष्टीमुळे काही रस्ते खराब झालेले आहेत. सदर रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम विविध योजनांतर्गत उपलब्ध होणा-या निधीनुसार टप्प्याटप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यातील वाढत्या बेरोजगारीबाबत

(३५) १२१२० (११-०९-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यामध्ये बेरोजगारी असल्याने व सध्या टाळेबंदीमुळे आणखी बेरोजगारांची भर पडणार असून यापूर्वी जिल्ह्यातील सर्वात मोठे क्षेत्रफळ व लोकसंख्या असणाऱ्या या तालुक्यात ग्रामीण कौशल्य विकास योजना अयशस्वी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जत तालुक्यात सदर योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०२-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

टेंभुर्णी (जि.सोलापूर) येथे उपजिल्हा रुग्णालय होणेबाबत

(३६) १२१९६ (१७-०७-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभुर्णी (जि.सोलापूर) हे पुणे-सोलापूर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असून तेथे पंढरपूर, अहमदनगर, शिर्डी येथून येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने त्या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी केवळ प्राथमिक आरोग्य केंद्र अस्तित्वात असून येथे एम.आय.डी.सी व मोठी बाजारपेठ आहे तसेच महामार्गावरील अपघाताची वाढती संख्या, दरवर्षी पंढरपूरला येणारे लाखो भाविक तसेच या परिसरातील ४० ते ५० गावांतील नागरिकांना वेळेत उपचार मिळत नसल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागत असल्याने या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय करणेचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०३-१२-२०२०) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) टेंभुर्णी (जि.सोलापूर) या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्याच्या प्रस्तावावर नियोजन विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामपंचायतीमधील आपले सरकार सेवा केंद्राबाबत

(३७) १२२२३ (०९-०९-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील किती ग्रामपंचायतीसाठी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन केले आहेत,
(२) असल्यास, प्रत्येक ग्रामपंचायतीकडून रुपये १२००० ते १२५०० निधि प्रती महिना वसूल करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र चालकासाठी (ऑपरेटर) प्रती महा ६००० रु वसूल केलेली रक्कम गैरहजर किंवा काम न केलेल्या कारणामुळे संबंधीत ग्रामपंचायतीला परत केली आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०९-१२-२०२०) : (१) राज्यात एकूण १९,६६६ आपले सरकार सेवा केंद्र स्थापन केले आहेत. त्यामार्फत राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना सेवा देण्यात येतात.
(२) अंशत: खरे आहे, ज्या ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र आहे, अशा ग्रामपंचायतीकडून प्रति महिना रू.१०,४५० + सेवा कर इतकी रक्कम व ज्या ग्रामपंचायती क्लस्टर्स मध्ये सामाविष्ट आहेत त्यांचेकडून त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात रक्कम विभागून त्याप्रमाणे रक्कम जिल्हा स्तरीय निधीला वर्ग करण्यात येते.
(३) सरसकट रू.६०००/- इतकी रक्कम परत देण्यात येत नाही. केंद्र चालकांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात त्यांच्या मोबदल्याची रक्कम ग्रामपंचायतीमार्फत निश्चित करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

"महाराष्ट्र तंबू संघटना" यांनी केलेल्या मागण्यासंदर्भात

(३८) १२६९९ (०९-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना विषाणूच्या संसर्गामूळे जाहीर करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे माहे मार्च, २०२० पासून गावागावात भरण्या-या यात्रा बंद झाल्यामुळे ग्रामीण जनतेला चित्रपट दाखविणाऱ्या फिरत्या चित्रपटगृहाच्या मालकांवर आर्थिक संकट आल्यामुळे राज्यातील मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील तंबू मालक आणि त्यावर उपजीविका असलेल्या एक हजार कामगारांवर सद्यस्थितीत उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, 'महाराष्ट्र तंबू संघटना'यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे तंबू मालकांना वार्षिक अनुदान आणि मासिक निवृत्तिवेतन देण्यासह यात्रेतील परवानगीसाठी एकल खिडकी योजना सुरू करावी तसेच फिरत्या चित्रपटगृहासाठी वीजजोडणी तसेच इतर परवानग्या मिळविणे सहज सुलभ होण्यासाठी व्यवस्था कार्यन्वित करावी इ. मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र तंबू संघटनेने केलेल्या उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२५-११-२०२०) : (१), (२) व (३) कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मार्च, २०२० मध्ये लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे देशातील बहुतांश उद्योग, व्यवसाय व त्यावर अवलंबून असलेल्या जतनेच्या उदर्निवाहावर परिणाम झाला आहे, ही वस्तूस्थिती आहे. तथापि, या संदर्भात महाराष्ट्र मालक तंबू संघटनेकडून मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदन प्राप्त झाल्याचे मुख्यमंत्री सचिवालयाच्या ई-ऑफिस प्रणालीवर आढळून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयातील अंगणवाडीना आहार पुरवठा कंन्झुमर फेडरेशन मार्फत होत असल्याबाबत

(३९) १२७५७ (०८-०९-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील अंगणवाडींना आहार पुरवठा हा कंन्झुमर फेडरेशनला देण्यात आला असल्याने आहार पुरवठा करित असलेले हजारो महिला बचतगटांचा रोजगार गेला असल्याचे दिनांक २५ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ५५२ एकात्मीक बालविकास प्रकल्प असून त्यापैकी १०५ शहरी आणि ४४७ हे ग्रामीण भागात असून ग्रामीण भागातील अंगणवाडीमध्ये तीन ते सहा वर्ष वयोगटातील बालकांना खिचडी व पोषण आहार दिला जात असून शहरी भागातील मुलांना महिला बचत गटामार्फत ताजा आहार शिजवून दिला जात होता परंतु कोरोना संसर्ग रोखण्यासाठी शासनाने टाळेबंदीच्या काळात दिनांक २६ मार्च ते १५ मे पर्यंत शहरी भागातील अंगणवाडयाना करण्यात येणारा आहार पुरवठा कन्झुमर फेडरेशनला देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बचत गटांची माहे डिसेंबर ते मार्च २०१९ पर्यतची देयके थकीत असतांना कंन्झुमर फेडरेशची टीएचआरची देयके काढण्यात आली असून आहार पुरवठा करीता दोन महिन्याची मुदत देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंन्झुमर फेडरेशनला आहार पुरवठा करण्यात येण्या-या लाभार्थीची यादी सादर करण्याबाबत न्यायालयाने चारवेळा निदेश दिलेले असतानाही त्यांनी न्यायालयात यादी सादर केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चैकशी केली आहे काय, तदनूसार नियमित आहार पुरवठा करणा-या महिला बचत गटांना अंगणवाडींना आहार पुरवठा करण्याचे काम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-११-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयामध्ये एकूण २४९६ अंगणवाडी केंद्र व १४७ मिनी अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. एकूण अंगणवाडी केंद्रापैकी फक्त १५३ अंगणवाडी केंद्रांना दि.२० मार्च,२०२० पर्यंत १३४ बचतगटांमार्फत गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येत होता. उर्वरित २३४३ अंगणवाडी केंद्रांना पुरवठा करणाऱ्या बचतगटांनी यापूर्वीच काम सोडून दिले असल्याने त्याठिकाणी गायत्री महिला संस्थेमार्फत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येत होता.

राज्यात मार्च-२०२० पासून कोवीड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्यामुळे अंगणवाडी केंद्रात एकत्र बसून लाभार्थ्यांना गरम ताजा आहार देणे शक्य नसल्यामुळे गरम ताजा आहार ऐवजी लाभार्थ्यांना घरपोच आहार देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या,मुंबई यांचेमार्फत आहार पुरवठा करण्यात येत आहे. यामुळे बचतगटांचा रोजगार काढून घेण्याचा कुठलाही हेतू नाही केवळ आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१९ ते मार्च, २०२० या कालावधीतील पुरवठादारांची देयके अदा करण्याकरीता जिल्हास्तरावर निधी वितरीत करण्यात आला असून देयकांची रक्कम अदा करण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावरुन करण्यात येत आहे. तसेच बचत गटांची माहे मार्च, २०२० अखेरपर्यंतची देयके अदा केल्यानंतर शिल्लक निधीतून महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या, मुंबई यांची THR ची देयके नियमानुसार अदा करण्यात येत आहेत.

राज्यात कोवीड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाला नसल्याने ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहार ऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार पुरवठा करण्यास दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, कोवीड-१९ चाप प्रादर्भाव नियंत्रणात आल्यानंतर अंगणवाडी स्तरावर अंगणवाडीत नियमित गरम ताजा आहाराचा पुरवठा बचतगटांमार्फत सुरु करण्यात येईल.

औरंगाबाद जिल्हयातील कोल्हापूरी बंधाऱ्यांची कामे अपूर्ण असल्याबाबत

(४०) १२७८१ (०९-०९-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील कोल्हापुरी बंधाऱ्यांना सन २०११ मध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून वेळोवेळी सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊनसुध्दा सदर काम पूर्ण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच मूळ काम पंधरा ते वीस लाख रुपयांचे असताना त्यावर कोट्यवधी रुपयांची मान्यता घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०४-१२-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणामध्ये जिल्हा परिषद स्तरावरील ७ शाखा अभियंता यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण करण्यात येवून चौकशी अंति ५ शाखा अभियंता यांचे विरुध्द शिक्षा आदेश बजावण्यात आले आहेत तर २ शाखा अभियंता यांचेविरुध्दचे दोषारोप सिध्द न झाल्याने त्यांना शिक्षा देण्यात आलेली नाही. तसेच सदर प्रकरणाशी संबंधित तत्कालीन उप अभियंता यांचेविरुध्दचे दोषारोप सिध्द न झाल्याने त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे.

तसेच सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सुमोटो जनहित याचिका क्र.९५/२०१२ दाखल झाली असून सदर याचिकेमध्ये दिनांक ५.३.२०२० रोजी झालेल्या सुनावणी-दरम्यान मा. न्यायालयाने सदर जनहित याचिकेमध्ये करण्यात आलेल्या आरोपांची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद करुन त्याअनुषंगाने सदर १५ कामांचे दरामध्ये अवैध व भरमसाठ करण्यात आलेली वाढ तसेच खर्च केलेल्या रकमेच्या प्रमाणात काम झाले नसल्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी श्री.आर.आर. बोरा, निवृत्त न्यायमुर्ती यांची नेमणूक केली असून सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत

(४१) १२८३८ (०९-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील नादुरुस्त रस्त्यांमुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०८-१२-२०२०) : (१) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयातील काही रस्ते अतिवृष्टीमुळे खराब झाले असून सदर रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(२) रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम या योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या दुरुस्तीकरिता सोलापूर जिल्हा परिषदेसाठी रु.१५०६.३४ लक्ष व उस्मानाबाद जिल्हा परिषदेसाठी रु.१५६९.४६ लक्ष एवढया निधीची कामे मंजूर असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गड-किल्ल्यांसह पुरातत्व वास्तूचे संरक्षण करणाऱ्या हंगामी कामगारांना गेल्या तीन ते सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत

(४२) १२९११ (०९-०९-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गड-किल्ल्यांसह पुरातत्व वास्तूचे संरक्षण करणाऱ्या हंगामी कामगारांना गेल्या तीन ते सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे एप्रिल २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदशर्नास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील गड किल्ल्याचे देखभाल करणाऱ्या १९३ कामगारांमधील १२१ कामगारांना टाळेबंदीमुळे वेतन देण्यास पैसे नसल्याने त्यांना कामावरून कमी करण्याचा पुरातत्व विभागाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील ऐतिहासिक वारसा जतन करणाऱ्या हंगामी कामगारांना थकित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेतहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (०४-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात आलेल्या कर्मचा-यांचे वेतन अदा करण्याकरिता आतापर्यंत रु.५७,३०,०००/- इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

तिवरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) धरणाची पुनर्बांधणी करण्यासह धरणग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत

(४३) १३२२० (११-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शेखर निकम (चिपळूण) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवरे भेंदवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरण फुटीची दुर्घटना दिनांक २ जुलै २०१९ रोजी होऊन अनेक घरे उद्धवस्त झाली असून २३ जणांचा बळी गेला होता तसेच या धरण क्षेत्रावर असलेल्या पाणी योजना धरण फुटीमुळे बंद असल्याने पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिवरे येथील धरणफुटी प्रकरणी तत्कालीन शासनाने जलसंपदा विभागाचे सचिव तथा विदर्भ सिंचन विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री.अवनिश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली तपासणी पथक नेमले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या निर्देशानुसार धरण फुटीच्या कारणांचा शोध घेऊन दोषींवर जबाबदारी निश्चित करणे, भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी उपायोजना सुचविणे ही या चौकशी पथकाची कार्यकक्षा ठरवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारसींनुसार तिवरे धरणफुटी प्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यासह तिवरे धरणाची पुनर्बांधणी व धरणग्रस्थांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०३-१२-२०२०) : (१) हे अंशत: खरे आहे.

तिवरे धरणफुटी दुर्घटनेत एकुण २२ व्यक्तींचा बळी गेलेला आहे. सदर धरणक्षेत्रातील तिवरे गावठाण, तिवरे कुंभारवाडी, कादवड व आकले या ०४ नळपाणी पुरवठा योजना क्षतिग्रत झाल्या होत्या. सद्यस्थितीत तिवरे गावठाण व तिवरे कुंभारवाडी या नळपाणी योजना कार्यान्वित झाल्या आहेत. आकले व कादवड नळपाणी पुरवठा योजनांची तात्पुरती दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) याप्रकरणी नेमलेल्या विशेष चौकशी पथकाने दिनांक ०६/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केलेला आहे.

(५) विशेष चौकशी पथकाने अहवाल तयार करताना सदर धरणाच्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रांची व इतर अन्य बाबींची तपासणी केली नसल्याचे अहवालाच्या छाननी अंती निदर्शानास आले आहे. त्याअनुषंगाने तपासणी/कार्यवाही करण्याच्या दृष्टीने विशेष चौकशी पथकाने सादर केलेल्या अहवालाचे पुनर्विलोकन करण्यासाठी शासन निर्णय दि. २०/१०/२०२० अन्वये पुनर्विलोकन समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

तिवरे धरणाच्या पुनर्बांधणी कामाच्या रु. १४०१.५९ लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकावर शेरे उपस्थित करण्यात आले असुन त्याची पुर्तता करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तिवरे धरणफुटी दुर्घटनेत तिवरे भेंदवाडी येथिल ४५ घरे व १३ गोठे यांना क्षती पोहचलेली असल्याने बाधित आपदग्रस्तांना मौजे तिवरे येथेच कंटेनर रुपी तात्पुरती निवासस्थाने आवश्यक सोईसह उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तिवरे येथिल बाधित घरांचे तसेच परिसरातील भविष्यात धोका पोहचू शकेल अशा एकुण ५६ घरांचे कायमस्वरूपी पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी होणे आवश्यक असल्याने पुनर्वसानासाठी मौजे पिंपळी बु., मौ.पेढांबे, मौ.अलोरे, मौ.कापसाळ ता.चिपळूण येथिल उपलब्ध जागांची स्थळपाहणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मौजे अलोरे ता. चिपळूण येथिल जलसंपदा विभागाची जागा उत्कृष्ट असल्याने मौजे अलोरे येथील स. नं.१०४ व सं. नं.१०५ या जागेमध्ये तिवरे धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने मौजे तिवरे येथील आपदग्रस्तांच्या पुनर्वसानासाठी कोयना प्रकल्पाच्या नावे असलेली मौजे अलोरे व मौजे नागावे येथिल एकुण १४.१९.५० हे. आर विनावापर जमीन मिळकतीचे अभिलेख महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्यात आले आहेत. तिवरे येथील बाधितग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अंदाजित रु.११५०.०० लक्ष इतकी रक्कम आवश्यक आहे. श्री.सिध्दिविनायक मंदिर न्यास, मुंबई कडून प्राप्त रु.०५.०० कोटी निधीमधून १ ते २४ घरांच्या बांधकामाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. उर्वरित २५ ते ५६ घरांच्या बांधकाम, सभागृह व इतर संकिर्ण कामे यासाठी आवश्यक निधी प्राप्त करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील विविध गावामध्ये नवीन साठवण तलाव व बंधारे बांधण्याबाबत

(४४) १३६२६ (११-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील विविध गावामध्ये नवीन साठवण तलाव व बंधारे बांधण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विविध गावामध्ये बंधारे, तलाव झाल्यास तालुक्यातील शेतीला पाणी मिळेल तसेच हा भाग दुष्काळमुक्त होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,खानापूर तालुक्यातील विविध गावामध्ये नवीन साठवण तलाव व बंधारे बांधण्याचा प्रस्ताव तात्काळ मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (१८-११-२०२०) : (१) अंशत: हे खरे आहे.

जलसंधारण विभाग, सांगली या विभागाकडे लोकप्रतिनिधींनी ५४ कामांची मागणी केली आहे.

(२) अंशत: हे खरे आहे.

सदर कामे पूर्ण झाल्यानंतर २१३६.६६ स.घ.मी. पाणीसाठा निर्माण होऊन ४२८ हे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. तसेच जिल्हा परिषद, सांगली विभागामार्फत ५ गेटेड/को.प.बंधाऱ्यांची कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ च्या आराखडयात समाविष्ट आहेत. या कामांमुळे १२३.७७ स.घ.मी. पाणीसाठा निर्माण होऊन २६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

वरील कामांमुळे शेतीला पाणी मिळून खानापूर तालुक्यातील काही भाग दुष्काळमुक्त होण्यास मदत होईल.

(३) सदर ५४ कामांपैकी ६ कामे पूर्ण झाली आहेत, २ कामे प्रगतीपथावर आहेत. २ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. पाझर तलावाचे काही बुडीत क्षेत्र वनक्षेत्रात येत असल्याने ३ कामांच्या वन जमीन संपादानचा प्रस्ताव वन विभागाकडे सादर करण्यात आला आहे. २८ कामांच्या अंदाजपत्रकाचे काम प्रगतीपथावर आहे. १० कामे जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली आहेत,

शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ४ मे २०२० नुसार नवीन योजना प्रस्तावित करु नयेत असे आदेश असल्याने ३ योजनांची अंदाजपत्रके विभागीय कार्यालयास परत करण्यात आलेली आहेत.

जिल्हा परिषद, सांगली विभागामार्फत ५ गेटेड/को.प. बंधाऱ्यांची कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ च्या आराखडयात समाविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

(४५) १३८४२ (०९-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत बल्लारपूर येथील लोकप्रतिनीधीनी मा.वैद्यकिय शिक्षण मंत्री यांना दिनांक १६ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (०८-१२-२०२०) : (१) होय. दिनांक १६/०६/२०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ०२/०९/२०२० अन्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी (कनिष्ठ निवासी १/२/३ व वरिष्ठ

निवासी १/२/३) यांच्या विद्यावेतनात दिनांक ०१ मे,२०२० पासून प्रतिमहा रुपये १०,०००/- इतकी ठोक वाढ लागू करण्यात आली आहे.

तसेच, ज्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सी.पी.एस.अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे, अशा महाविद्यालयांमध्ये कनिष्ठ निवासी-१ पदांकरिता देण्यात येणारे म्हणजेच रुपये ६४०२६/-(दरमहा) इतके विद्यावेतन अदा करण्यात येत आहे. त्याव्यतिरिक्त ,सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सुरु असलेल्या सीपीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेशित खाजगी उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रतिमहा रुपये २५,०००/- इतके विद्यावेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ख्वाजा युनुस यांच्या हत्ये प्रकरणी पुराव्यासोबत छेडछाड करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(४६) १३८७६ (१३-०९-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ख्वाजा युनुस यांच्या हत्ये प्रकरणी पुराव्यासोबत छेडछाड करण्याचा आरोप असलेल्या ४ पोलीस कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश रद्द करून त्यांना पुन्हा कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश मुंबई पोलीस आयुक्त, परमवीर सिंह यांच्या अध्यक्षते खालील समितीने दिल्याचे दिनांक ४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी ख्वाजा युनुस यांना न्याय मिळत नसल्याची भावना सामान्यांमध्ये निर्माण झाली असून आरोपींना कठोर शिक्षा करण्याबाबत मागणी सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी व सेवाभावी संस्था यांच्यामार्फत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. अनिल देशमुख (२३-११-२०२०) : (१) हे खरे आहे, सदर निर्णय दि.०५/०६/२०२० रोजीच्या निलंबन आढावा समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन घेण्यात आला आहे.

(२) सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी व सेवाभावी संस्थांकडून आरोपीना कठोर शिक्षा करण्याबाबतची मागणी करण्यात आल्याचे अभिलेख्यात आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुकडी धरणाच्या येवा क्षेत्रातून पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४७) १४३३५ (०८-०९-२०२०). श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी धरणाच्या येवा क्षेत्रात नेहमी पुर परिस्थिति निर्माण होत असल्याने याबाबत शासनाने अभ्यास केला आहे काय,

(२) असल्यास, हे पाणी भीमा नदीत सोडले जाते व खाली उजनी धरण भरुन अतिरिक्त पाणी कृष्णा नदीला जाते त्यातील जास्तीत जास्त पाणी वाहून जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे वाहून जाणारे पाणी अवर्षण भागातील कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यासाठी १.०० अ.घ.फु. व आष्टी (जि.बीड) तालुक्यासाठी ०.५० अ.घ.फु. तसेच कुकडी धरणाच्या येवा क्षेत्रातून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्यापैकी सीना निमगांव धरणात पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-११-२०२०) : (१) अंशत: खरे आहे.

कुकडी प्रकल्पाच्या येवा क्षेत्रातील पुराबाबतचा अभ्यास १९९४ साली मध्यवर्ती संघटना नाशिक व २०१४ साली पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

कुकडी प्रकल्पातील सांडण्यावरुन सोडलेले पाणी भिमा नदीमध्ये व तिच्या उपनद्याव्दारे उजनी प्रकल्पामध्ये जाते.

(३) कुकडी प्रकल्पाच्या मंजूर तृतिय सुप्रमामध्ये सीना मध्यम प्रकल्पासाठी फक्त १०० द.ल.घ.फू. पाणी देण्याची तरतुद आहे. सिना प्रकल्प (भोसे खिंड बोगद्यासह) या सुप्रमामध्ये कुकडी डाव्या कालव्याव्दारे सीना प्रकल्पामध्ये १.२ टीएमसी पुराचे अतिरिक्त पाणी सोडणेबाबत तरतुद आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि दुर्गम भागात कुपोषित बालकांची संख्या वाढत असल्याबाबत

(४८) १४३५९ (१०-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि दुर्गम भागात कोरोना आजाराचा प्रादुर्भाव होत असताना कुपोषित बालकांची संख्या देखिल वाढत असल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयात कायम बाल उपचार केंद्र सुरू राहावे अशी मागणी आरोग्य अधिकाऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून त्याबाबत कोणतीही दखल घेतली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासींचे जीवनमान सुधारण्याकरिता व कुपोषणाचे प्रमाण कमी होण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०८-१२-२०२०) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) रायगड जिल्हयामध्ये जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे माहे ऑक्टोबर, २०१२ पासून पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) सुरु करण्यात आलेले आहे. तसेच कर्जत उपजिल्हा रुग्णालय येथे माहे सप्टेंबर, २०१९ पासून बाल उपचार केंद्र सुरु करण्यात आले आहे.

शासनाने कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी व आदिवासींचे जीवनमान ससुधारण्यासाठी पोषण पुनर्वसन केंद्र, बाल उपचार केंद्र, मा कार्यक्रम, ॲनिमिया मुक्त भारत, अतिसार नियंत्रण पंधरवडा, घरच्या घरी बालकांची काळजी (HBNC & HBYC), राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, नवसंजीवनी कार्यक्रमातील भरारी पथक, मातृत्व अनुदान व दाई बैठक योजना, गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसूती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे व पालघर जिल्हयात आमदार निधितुन कोरोना या संसर्गजन्य आजारासाठी दिलेल्या निधिच्या विनियोगाबाबत

(४९) १४४४८ (११-०९-२०२०). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी आमदार निधितुन दिलेला निधि कोविड १९ संबंधित सेवा देणारे अधिकारी व कर्मचारी यांना दिलेल्या निधिच्या खर्चाचा अहवाल सादर करावा तसेच सदरचे साहित्य कोणत्या संस्थेमार्फत पुरविण्यात आले व सदर संस्था ही शासनमान्य आहे काय याबाबत शासनाने चौकशी करुन अहवाल सादर करावा अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (०८-१२-२०२०) : (१) व (२) ठाणे व पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी आमदार निधीतुन दिलेला निधी कोविड-१९ संबधित सेवा देणारे अधिकारी कर्मचारी यांना दिलेल्या निधीच्या खर्चाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन नियोजन विभागास प्राप्त झालेले नाही. तथापि, या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे व जिल्हाधिकारी पालघर यांचेकडून प्राप्त माहिती अनुसार ठाणे व पालघर जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीमधून "कोविड-१९" संबंधित उपाययोजनांसाठी दिलेल्या निधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

(रु. लाखात)

अ.क्र.	कार्यान्वयीन यंत्रणा	मंजूर निधी	झालेला खर्च
	अ) ठाणे जिल्हा		
१	सामान्य रुग्णालय, ठाणे	१९६.९०	१९१.६२
२	जिल्हा परिषद ठाणे	६०.१३	४१.७६
३	ठाणे महानगरपालिका	३९.९८	२४.९७
४	मिरा-भाईंदर महानगरपालिका	५४.१०	५३.८७
५	कल्याण-डोंबिवली महानगरपलिका	१५६.४०	१४१.६६
६	कुळगांव-बदलापूर नगरपरिषद	२९.९८	१४.०७
७	भिवंडी-निजामपूर महानगरपालिका	२९.९९	२९.९९
८	नवी मुंबई महानगरपालिका	१४८.४४	९८.००
	एकूण	**७१५.१२**	**५९५.९४**
	ब) पालघर जिल्हा		
१	सामान्य रुग्णालय पालघर	६६.००	२८.५०
२	जिल्हा परिषद पालघर	६.२०	००.००
३	वसई-विरार महानगरपालिका	१००.००	००.००
	एकूण	**१७२.२०**	**२८.५०**

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बारामती (ता.बारामती, जि.पुणे) येथील माळेगाव कॉलनी परिसरात अतिक्रमण करून घरे बांधून राहणाऱ्या कुटुंबांना जागा हस्तांतरित करणेबाबत

(५०) १४६४२ (११-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बारामती (ता.बारामती, जि.पुणे) येथील माळेगाव कॉलनी परिसरातील जलसंपदा विभागाच्या गट नंबर ९२/१/३१/१ मधील १०२९४.०८ चौ मी क्षेत्रावर विविध जाती धर्मातील मुल मजुरी करणारी कामगारांची १३१ कुटुंब अतिक्रमण करून घरे बांधून मागील सुमारे ५७ वर्षापासून राहात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जलसंपदा विभागाच्या जागेवर मागील सुमारे ५७ वर्षापासून (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या निर्मिती पूर्वी)अतिक्रमण असल्याने व आता सदर व गोरगरिबांना इतरत्र जाणे शक्य नसल्याने मानवतेच्या दृष्टिकोनातून अतिक्रमण केलेली शासकीय जागा शासनाचे धोरणानुसार जिल्हाधिकारी मार्फत संबंधित कुटुंबांना हस्तांतरित करण्याचे आदेश व्हावेत असे श्री.पांडुरंग फुंडकर, तत्कालीन विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी मुख्यमंत्री यांना त्यांचे पत्र क्रमांक विपने/विप/३१८/२००६ दिनांक ९ जून २००६ रोजी कळविले असताना तत्कालीन जलसंपदा मंत्री तसेच विद्यमान उपमुख्यमंत्री यांनी त्यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २००६/(२०७/२००६)/सी व्य (म) दिनांक २४ जानेवारी २००८ अन्वये सदर नागरिक ५७ वर्षापासून राहात असल्याने त्या लोकांची निवासी घरे हटविणे उचित होणार नसल्याने अतिक्रमित जागेची मोजणी करून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या धोरणानुसार नियामक मंडळाच्या मान्येने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सदर जागा हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत असे लेखी स्वरूपात तत्कालीन विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांना कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवरील अतिक्रमण सन १९५० पासून म्हणजे महामंडळाच्या निर्मिती पुर्वीच झालेले असल्यामुळे सदर प्रकरणी शासन स्तरावरूनच पुढील योग्य ती कार्यवाही करणे उचित राहील असे श्री.अ.द. व्यास, विशेष अधीक्षक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, पुणे यांचे स्वाक्षरीनिशी पत्र क्रमांक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ/आ. ३/(११२/६)/९८८६ दिनांक १५ नोव्हेंबर २००७ सचिव (ज.स.) जलसंपदा विभाग यांना लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मालेगाव कॉलनी तालुका बारामती जिल्हा पुणे येथिल सुमारे ५७ वर्षापासून अतिक्रमण करून घरे बांधून राहात असलेल्या नागरिकांना शासनाचे धोरणानुसार सदर अतिक्रमीत जागा त्यांचे नावावर अदयापपर्यंत हस्तांतरीत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर जागेवरील अतिक्रमण महामंडळाच्या निर्मिती पूर्वीचे झालेले असल्याने जलसंपदा विभागाची जागा सदरहू नागरिकांच्या नावावर विनाविलंब हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-११-२०२०) : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) महामंडळाच्या मालकीच्या ताब्यातील जमिनी इतर संस्थांना / व्यक्तींना भाडेपट्टयाने दिलेल्या जागांबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ५२/२००१, १४८/२००६, १२२/२००८, ०२/२००९ न्याय प्रविष्ट असल्याने अतिक्रमित कुटुंबाना जागा हस्तांतरणाची मागणी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे स्तरावर अमान्य करण्यात आले आहे.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.